ISSN 2319-8648

# Current Global Reviewer

International Research Journal Registered & Recognized Higher Education For All Subjects & All Languages

Editor In Chief

**Arun B. Godam**

Dec - 16 - (1)


# Current Global Reviewer

ISSN 2319-8648

International Research Journals Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

Editor in Chief
Mr. Arun B. Godam

Vol I Issue VII, Year III ( Half Yearly) Nov. 2015 to Apr . 2016



**Editorial Office :**

Khadgaon Road, Kapil Nagar, Latur, Dist. Latur 413512 (M.S.) India.

**Contact :-**

Arun B. Godam

8149668999, 8483959442

**E-mail :**

itechresearch11@gmail.com.



## EXECUTIVE EDITORS

**Dr. Hanumant Mane**
R.Guide & Head, Dept. of Marathi,
Shivchatrapati College,
Kalam, Dist. Osmanabad(M.S.)

**Dr. N.J. Waghmare**
Res. Guide & Head,Dept. of Pali,
Govt. Sanatketar College,
Shivani, (M.P. )

**Dr. U.T. Gaikwad**
Dept. of Geography,
Smt. S. D. M. College
Latur, Dist. Latur (M.S.)

**Dr U.V.Panchal**
H.O.D, Dept of Commerce,
Deogiri College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Pro. S.B. Karande**
Dept. of Economics,
Shri Bhausaheb Vartak College,
Borivali (W), Dist. Mumbai.

**Dr M.U. Yusuf**
Assistant Professor,
Dept of Commerce,
Sir Sayyed College,
Auranbadad, Dist. Aurangabad

## DEPUTY EDITORS

**B.J. Hirve**
Dept. of botany
Vasant Mahavidyalaya,
Kaij, Dist. Beed. (M.S.)

**S.M. Bansode**
Dept. of Sociology,
Shri Shiv Shahu Mahavidalaya,
Sarud, Tq, Shahuwadi, Dist. Kolhapur

**Maimanat Jahan Ara**
Head, Dept of Political Science,
Sir Sayyed College,
Aurangabad, Dist. Aurangabad

**Dr. B.T. Lahane**
Principal, Head, Dept. of English,
Sambhajirao Kendre College,
Jalkot, Dist. Latur (M.S.)



Shaurya Publication,
Latur

Price : Rs. 250/-

www.rjournals.co.in

CURRENT GLOBAL REVIEWER ISSN - 2319- 8648
Half yearly Research Journal 4 Vol I Issue VII, Nov. 2015 to Apr. 2016

# INDEX


| Sr. No. | Title of Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Consumer Satisfaction In Automobile Industries | Dr. E.J.Helge | 7-10 |
| 2 | Information And Communication Technology (ICT) In Eductaion | Dr Gangwal Umesh Babanlalji | 11-14 |
| 3 | It-Services In Business | Kharat Nitin Gangadhar | 15-18 |
| 4 | Small-Scale Industries and Entrepreneurship | Sandip Vanjari | 19-22 |
| 5 | Global Order Entrepreneurs | Dr V. B. Pathan | 23-27 |
| 6 | Implementation of Information Technology in Indian Banking | Nishikant.C Dhande | 28-30 |
| 7 | Technological Upgradation & Rural Economic Develpoment | Rizwan Khan | 31-34 |
| 8 | Challenges Faced by Banking Industry in India | Laxmnarayan C. Kurpatwar | 35-37 |
| 9 | Paperless Banking : The Need of the Hour | Dr Meena M.Wadgule | 38-41 |
| 10 | Marketing Channels & Marketing Channel Management | Dr S. S. Ranmare | 42-46 |
| 11 | Data Warehousing And Data Mining : Pros And Cons | Sannake Amasiddha C | 47-50 |
| 12 | Financial Services And Consumer Behaviour | Dr M. U .Yusuf | 51-57 |
| 13 | Entrepreneurship To Drive Indian Economy | Gholkar D. R. | 58-64 |
| 14 | Adoption of Management Information Systems in Business Enterprises | Prof F.A .Baig | 65-70 |
| 15 | E-Learning : Not A Dream But Reality | Dr Vinod Ratiram Bansile | 71-75 |
| 16 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक न्याय | प्रा.रेणुका रविंद्र घाडे, प्रा.डॉ.लक्षटे रत्नाकर बाबुराव | 76-80 |

CURRENT GLOBAL REVIEWER ISSN - 2319-8648
Half yearly Research Journal 76 Vol 1 Issue VII, Nov. 2015 to Apr. 2016

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक न्याय

प्रा.रेणुका रविंद्र घाडे
ग्रंथालय विभाग
देगलूर महाविद्यालय देगलूर

प्रा.डॉ.लखटे रत्नाकर बापुराव
पदवी व पदव्युत्तर राज्यशास्त्र विभाग प्रमुख
देगलूर महाविद्यालय, देगलूर.

10

**Research Paper - Political Sci.**

**प्रस्तावना :** भारतीय समाज सदैवच जातीप्रधान आहे. आजही प्रत्येक क्षेत्रात त्याचा प्रभाव जाणवतो. राजकारण, अर्थव्यवस्था, शिक्षण आणि संस्कृतीसह समाजातील प्रत्येक भागात प्रकर्षाने जातीची भुमिका पाहण्यास मिळते. उदा : महाराष्ट्रात मराठा जातीचे मोर्चे. डॉ.बाबासाहेब आंबेडकराच्या अगोदरच्या काळात भारतात अस्पृश्य हिंदू होते. जे समाजात अमानुष व शोषित होते. त्यांची स्थिती गुलामाच्या स्वरुपात होती. ज्यांना प्रत्येक मानवी हक्कांपासून वंचित ठेवले होते. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म एका अस्पृश्य कुटूंबात झाला होता. असमानता, अन्याय, शोषण आणि मानवी हक्कांच्या ऱ्हासामुळेच आंबेडकरांना जीवनाचे ध्येय गाठता आले. त्यांनी आयुष्यभर सामाजिक न्यायाची प्राप्ती आणि एक न्यायपूर्ण समाजाच्या स्थापनेसाठी संघर्ष करत होते. त्यांना जातीवीहिन समाजाची स्थापना करायची होती. त्यांनी सामाजिक व्यवस्थेची कट्टर चिकित्सा केली. तसेच सामाजिक न्याय, समता आणि बंधुतेवर आधारित सामाजिक व्यवस्थेचे प्रतिमान मांडले. ज्याची प्रतिकृती भारतीय राज्यघटनेतून स्पष्टपणे जाणवते.

**संशोधनात्मक आराखडा :**

डॉ.बाबासाहेबांनी आयुष्यभर सामाजिक न्यायाच्या प्राप्तीसाठी संघर्ष केला यास गृहित मानुन हा लेख लिहिला. आंबेडकरांनी सामाजिक न्यायाच्या प्राप्तीसाठी काय केले ? हे जाणुन घेण्याच्या हेतूने विचार केला. सामाजिक न्यायाच्या प्राप्तीतील तत्कालीन व वर्तमानातील घटकावर प्रकाश टाकला. ज्यासाठी विश्लेषण व वर्णनात्मक अभ्यास पध्दती प्रमाण मानली. या विषयावरील चिंतनास पूर्णत्वाच्या दिशेने नेण्यासाठी आंबेडकरांनी लिहिलेल्या प्राथमिक साहित्यासह दुय्यम साहित्याचा आधार घेवून तथ्य संकलन, वर्गीकरण केले. संबंध भारतातील वाढते जातीय तेढ, आरक्षणाच्या नावाखाली इतर जातीतील वर्गात द्वेष निर्माण करण्याचे प्रयत्न, मागासवर्गावरील वाढते अत्याचार व त्यास प्रतिउत्तर म्हणून शासनाकडून होणाऱ्या नाटकीय कार्यवाहीत सामाजिक न्याय लुप्त होतो. त्यास पुनर्जीवित करण्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे विचार कसे समर्थक आहेत हे स्पष्ट होण्याइपतपची उपयुक्तता या लेखाची आहे.

सामाजिक न्यायाशी संबंधीत अनेक सिध्दांत, विचार व उपक्रम चार्वाक, गौतम बुध्द, महात्मा बसवेश्वर, संत कबीर, संत तुकाराम व इतर वारकरी संत आणि पुरोगामी विचारवंताच्या लेखनातून स्पष्टपणे जाणवतात.

CURRENT GLOBAL REVIEWER
Half yearly Research Journal
ISSN - 2319- 8648
Vol I Issue VII, Nov. 2015 to Apr. 2016


परंतू या शब्दाचा सर्वप्रथम १८४० लेखक सिसलीच्या Luigi Taparellid Azeglio यांच्या मार्फत करण्यात आला. त्यानंतर पूढे चालून ब्रिटीश अभ्यासक आणि जे.एस.मिल व सिजविकने वारंवार त्याचा प्रयोग केला. १९०० साली विलोबीने सामाजिक न्याय नावाचे पुस्तक प्रकाशित केले. राज्यशास्त्राच्या अधिकतर अभ्यासकांच्या मते सामाजिक न्याय वितरणाच्या न्यायाचे प्रतीक आहे. वास्वततेत ते दोन्ही एकमेकांसाठी वापरात आणले जातात. सामाजिक न्यायाचा उद्देश संपूर्ण समाजाचे कल्याण व विकास आहे, कोणत्या एका वर्गाचा नाही. ते समाजातील प्रत्येक व्यक्तिचा विकास करु इच्छितात, जात, धर्म, संप्रदाय व लिंगाच्या आधारावर समाजात कोणताही भेदभाव नसावा.

सामाजिक न्यायाचा आधारभूत सिध्दांत मागास शोषित व समाजाच्या इतर कमकुवत व मागास वर्गाच्या लोकांचे शोषण, अन्याय व अत्याचारापासून सुटका करणे. त्यांना सामाजिक, आर्थिक शोषण व भेदभावापासून मुक्त करणे हा प्रमुख उद्देश आहे. ती समाजातील प्रत्येक वर्गास स्वतंत्र व समान अधिकाराची सुनिश्चिती करु इच्छितात. स्वातंत्र्य, समता व सन्मान सामाजिक न्यायाचे ध्येय आहे. या तिन्हीशिवाय न्यायाची प्राप्ती शक्य नाही. सामाजिक न्यायाच्या प्रति आंबेडकरांचे विचार मानवतावादी व राष्ट्रवादी होते. ते राष्ट्रवादाचे समर्थक होते. त्यांच्या मते राष्ट्रवाद मानव जीवनाची वार्स्तविक शक्ती आहे. ते विदेशी साम्राज्यातून भारतीयांना स्वातंत्र्य मिळावे यासाठी प्रयत्नरत होते. त्यासोबतच ते अंतर्गत स्वातंत्र्याचे समर्थक होते. ते मानवतावादी प्रवृत्तीचे प्रमुख पक्षकार होते.

आंबेडकरांच्या मते, स्पृश्य-अस्पृश्यता भारतीय समाजात होती. अस्पृश्यांच्या स्थितीत सुधारणा होण्यासाठी इंग्रजांनी कांहीच प्रयत्न केले नाहीत. त्यांना राजकीय अधिकारापासून वंचीत ठेवते. अस्पृश्यांनी अस्पृश्यतेविरुध्द कधीच तक्रार करु नये असे त्या संकल्पनेचे सामाजीकरण करण्यात आले. अस्पृश्यता हेच त्यांचे नशीब व स्वर्ग आहे याची जाणीव करुन देण्यात आली. त्यामुळे त्यांनी त्यांच्या सुधारणेबाबत कधीच विचार केला नाही. अशा परिस्थितीत डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शपथ घेतली की ते या पाशास तोडून अस्पृश्यांच्या स्थितीत सुधारणा करतील. त्यांना सन्मान देण्यासाठी अजन्म संघर्ष करतील. आंबेडकरांच्या मते अस्पृश्यांच्या सार्वजनिक विहारावरही प्रतिबंध होते. मग ते रस्ता, नदी, नाले, शाळा असो, जर एखादा उच्चवर्णीय व्यक्ती रस्त्याने जात असेल तर अस्पृश्य व्यक्तीने आपली सावली त्यावर पडणार नाही. याची खरबदारी घ्यावी. हिंदु समाजात अस्पृश्यांची स्थिती गुलामासमान होती. त्यांच्यासोबत अमानवीय व्यवहार केले जात. स्वत: आंबेडकरांनी या सर्व यातना सहन केल्या आहेत. अस्पृश्यांना नागरिक समाजत नसत. त्यांना सामाजिक अधिकारापासून वंचित ठेवत. त्यांचे निवासस्थान गावकुसाबाहेर असत. हिंदू अस्पृश्यांच्या जवळ जात नसत. प्रत्येक हिंदू गावात एक अस्पृश्य वस्ती असत.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी अस्पृश्य सहकाऱ्यांना स्पष्ट शब्दांत सांगितले की, ज्यांच्याकडे ज्ञान, बुध्दि व शक्ती आहे ते सर्व अन्याय व अत्याचार करण्याच्या मार्नासकतेत आहेत. ज्यांच्याकडे यांपेकी काहीच नाही. त्यांच्यामते या सर्व बाबी अस्पृश्यांकडे नाहीत. त्यामुळे त्यांना अन्याय व अत्याचार सहन करावा लागतो. अस्पृश्यांचे जीवन असहाय्य बनवले होते. ज्यामुळे भोजन, वस्त्र व निवासाच्या पुर्ततेसाठी झगडावे लागत होते.

सोन्याची चिमणी म्हणणवणाज्या देशात अस्पृश्यांना अत्यंतीक गरीबीचा सामना करावा लागतो. आंबेडकरांनी मानले की, भारतात जाती प्रथा वर्णाश्रम व्यवस्थेवर आधारित होती या जातीप्रथेला हिंदू कायद्यामार्फत मान्यता दिली जाते. ज्यात समता, बंधुता, स्वातंत्र्य, प्रजातंत्र आणि मानवी हक्कांना पूर्णपणे दूर्लक्षीत केले जाते. त्यांच्या शब्दांत हिंदू कायद्याची निर्मिती सवर्णांनी केली. त्याचे पालन व सन्मान अस्पृश्यांना करावे लागते. सवर्णा विरुध्द अस्पृश्यांकडे कांहीच अधिकार नव्हते. त्यांच्यासाठी समान हक्क व न्यायासारखी कोणती बाब नव्हती. अस्पृश्यांना जे कांही मिळत ते सवर्णांच्या मदतीने व मर्जीनेच. अस्पृश्य अधिकारांसाठी दबाव टाकू शकत नव्हते. त्यांना दयेसाठी प्रार्थना करावी लागत. अन्यथा त्यांना जे मिळते त्यातच समाधान मानावे लागत. डॉ.आंबेडकरांच्या मते अशा प्रकारची व्यवस्था भारतात अनेक वर्षांपासून सुरु आहे. सवर्णांनी अस्पृश्यांना सामाजिक न्यायापासून वंचित ठेवले. अस्पृश्यांच्या धार्मिक व सामाजिक अधिकारांसाठी आंबेडकरांनी अनेक प्रयत्न केले. उदा : महाडच्या सार्वजनिक तळ्याचे पाणी पिण्याचा यशस्वी प्रयत्न (१९२७) नाशिकच्या काळाराम मंदिरातील प्रवेश ई. या सर्व प्रयत्नांनीही आंबेडकरांना संपूर्ण यश मिळाले नाही. त्यामुळे त्यांनी असा निष्कर्ष मांडला की, अस्पृश्य हिंदू समाजाचा भाग नाहीत. त्यांना हिंदूप्रमाणे समतेचा दर्जाचा कधीच दिला जाणार नाही. त्यामुळे त्यांनी हिंदू समाज जो ब्राह्मणवादी व्यवस्थेवर आधारित होता त्यास नाकारले व घोषणा केले की ते एक हिंदू म्हणून जन्मले असतील परंतू हिंदू म्हणून मरणार नाहीत.

आंबेडकरांनी जाती व अन्यायाविरुध्द लढा दिला. त्यांनी मानवी हक्कांसाठी तीव्र संघर्ष केला. ते सर्वांसाठी समान मानवी हक्काचे समर्थन होते. ते वास्तवतेत एक सामाजिक लोकशाहीची स्थापना करु इच्छितात. त्यांचे मत होते की, लोकशाही शासनासाठी लोकशाही समाज आवश्यक आहे. त्यांचा विचार होता की, लोकशाही हे फक्त शासनाचे स्वरुप नाही. तर ते समाजाचे एक स्वरुप आहे. लोकशाहीचा उद्देश संपूर्ण समाजाच्या व्यावहारिक हिताची पूर्तता करणे न की कोणत्या एका समूह व समूदायाची ते लोकशाहीस जनतेचे संघटक मानतात. ते जनतेअंतर्गत समाजातील प्रत्येक व्यक्तिंचा समावेश करतात, कोणत्या एका विशिष्टाचा नाही. त्यांच्यानुसार वास्तविक लोकशाही तीच आहे जी सर्वांच्या हितास प्राधान्य देते. अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मते, लोकशाही सामाजिक न्यायाचे एक अनिवार्य तत्व व अवयव आहे. स्वशसन ही एक चांगल्या शासनाची ओळख आहे. त्यांनी सुशासनाच्या स्वरुपाचा अभ्यास केला. अधिकाधिक लोकांचे हित करण्यासाठी शासनाने कार्यक्षम व्हावे. स्वार्थी वर्गाच्या हितापासून दूर राहावे. स्वशासनासोबतच सुशासनाची आवश्यकता आहे. अंततः ते दोघेही सामाजिक न्यायाच्या प्राप्तीत सहकार्य करतील.

आंबेडकरांनी भारतीय समाजाबाबत विचार करताना म्हटले, समाजातील खालच्या स्तरावरील जातीप्रथेला समाप्त करावे लागेल. जर त्यांना सुशिक्षित करायचे असेल तर जातीप्रथेचा अंत व्हावा. भारतीय लोकशाही आणखीन अधिकच प्रौढ व स्वस्थ होईल. त्यानुसार आम आदमीला सुशिक्षित करावे. त्यास राजकीयदृष्ट्या जागरुक बनवावे. म्हणूनच त्यांनी शिका संघटीत व्हा व संघर्ष करा ही घोषणा दिली. त्यांनी शिक्षणास सर्वाधिक प्राथमिकता दिली. आंबेडकरांचे मत होते की, सामाजिक समरसतेसाठी सामाजिक न्याय आवश्यक आहे. सामाजीक

ISSN : 2319-8648

न्यायासाठी मागास शोषित विकास आवश्यक आहे. ज्यामुळे त्यांचे सबलीकरण होईल. त्यासाठी शिक्षण व नोकरी आवश्यक आहे. अशाच काळात बाबासाहेबांनी शिक्षणावर अत्याधिक भर दिला. त्यांचे मत होते की, जोपर्यंत ते शिक्षण घेत नाहीत तोपर्यंत त्यांचा वास्तविक विकास होवू शकत नाही. त्यांना सामाजिक न्याय मिळणार नाही. बाबासाहेब शिक्षणास सामाजिक द्वेष व अन्यायाला समाप्त करण्याचे रामबाण औषध मानतात. त्यांचे मत होते की, भारतात सामाजिक अन्यायाचे कारण फक्त आर्थिकता नसून सांस्कृतिक ही होते. सामाजिक न्यायाचा अर्थ हा नाही की अस्पृश्यांना घर खाण्यास द्यावे आणि त्यांनी उच्च वर्णियांची सेवा करत राहावे. सामाजिक न्यायाची प्राप्ती तेंव्हाच होईल जेंव्हा त्यांच्या डोक्यातील कनिष्ठत्वाचा भाव होईल. ज्यामुळे त्यांच्या विकासाची प्रक्रिया थांबली आहे. त्यांचे जीवन समाज व देशासाठी किती महत्वाचे आहे हा भाव जागृत होईल. आंबेडकर पूर्णपणे आश्वस्त होते की, हे सर्व तेंव्हाच होईल जेंव्हा त्यांना शैक्षणिकदृष्ट्या सशक्त बनवले जाईल. तेंव्हाच वास्तविक सामाजिक न्यायाची प्राप्ती होईल. आंबेडकरांनी अस्पृश्यता, गुलामगिरी व शोषणाचा विरोध केला. बहिष्कृत हितकारणी सभेची स्थापना केली. या संस्थेमार्फत अस्पृश्यांना शिक्षणाचा प्रचार-प्रसार केला. शिक्षणाच्या प्रचार व प्रसारासाठी त्यांनी सामाजिक केंद्र, अभ्यास केंद्र आणि पुस्तकालयाची स्थापना केली. या संस्थेने दलितांच्या आर्थिक स्थितीत सुधारणेसाठी प्रयत्न केले. त्यात कृषी आणि औद्योगिक विद्यालयाची स्थापना केली.

ब्रिटीश शासनादरम्यान आंबेडकर समाजातील शोषीत व दलित वर्गाचा आवाज होते. त्यांच्या हित संरक्षणाप्रती ते कटिबध्द होते. त्यांनी त्यांच्यासाठी इंग्रजाकडे विभिन्न सुरक्षात्मक उपायाची मागणी केली. त्यांच्यासाठी ते सर्व प्रकारच्या शैक्षणिक सुविधा मागत होते. केंद्र आणि राज्यविधान परिषदेत त्यांना लोकसंख्येच्या आधारावर प्रतिनिधीत्व द्यावे. केंद्र व राज्य शासनाच्या नोकरीत आरक्षण द्यावे. यासर्व उपायामार्फत आंबेडकर दलित व शोषितांचा सर्वांगीण विकास व प्रगती करु इच्छितात. स्वातंत्र्यानंतरही आंबेडकरांनी दलित व शोषितांच्या विकासासाठीची कटिबध्दता व्यक्त केली. ते त्यांना मुलभुत मानवी हक्क देवू इच्छितात. स्पृश्य-अस्पृश्यतेसारख्या इतर सर्व प्रकारच्या भेदभावना समाप्त करु इच्छितात. या सर्व ध्येयाच्या प्राप्तीसाठी त्यांनी संविधानकाराची भुमिका जबाबदारीने बजावली. समाजातील कमकुवत, दलित व शोषित वर्गांच्या लोकांसाठी राज्यघटनेत अनेक तरतूदी केल्या. त्यांच्यासाठी आरक्षणाची तरतूद केली. आंबेडकरांचे मत होते की, आरक्षणाच्या साह्याने या वर्गांचा सामाजिक व आर्थिक दर्जा सुधारता येतो. परंतु आरक्षणाची ही तरतूद एका विशिष्ट कालावधीपर्यंतच द्यावी असेही बाबासाहेब म्हणत. त्यामुळे त्यांनी राज्यघटनेच्या निर्मितीवेळी १० वर्षांसाठीच आरक्षणाची तरतूद असावी अशी नोंद केली. आंबेडकरांच्या मते समाजात शांतता व न्यायाची स्थापना करण्यासाठी कायदा आवश्यक आहे. कायदा समाजाच्या विभिन्न समूह व हितात संतुलन स्थापन करतो. तो समाजात समानता व स्वातंत्र्याचा अभिभावक आहे. तो समाज व राष्ट्राला नियंत्रित करतो. समाजाचा प्रत्येक नागरिक कायद्यासमोर समान आहे. तसेच सर्व नागरिक अधिकार त्यांच्याकडे आहेत. अशाप्रकारे आंबेडकर कायद्याच्या अधिराज्यात विश्वास ठेवतात. त्यांचा विचार होता की व्यक्तिगत स्वातंत्र्य आणि सन्मानासाठी कायद्याचे शासन आवश्यक आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर अन्याय, अत्याचार व सामाजिक अवडंबर आणि कुरितींना विरोध केला.

त्यांनी गरिबी व अज्ञानतेचा विरोध केला. ते समाजातील कमकुवत व दलित वर्गाच्या लोकांना या सर्वांपासून मुक्त करु इच्छितात. आंबेडकरांनी सर्व प्रकारच्या समाजिक भेदभावाचा विरोध केला. समाजात संधीची समानता आणु इच्छितात. ते जाती, समुदाय व सामाजिक स्थितीच्या आधारावर कोणत्याही प्रकारच्या भेदभावाविरुध्द होते. जातिच्या आधारावर शासकीय अथवा खाजगी व्यक्तिंकडून होणाज्या भेदभावाच्या विरोधी होते. जातीच्या आधारावर शासकीय अथवा खाजगी व्यक्तिंकडून होणाज्या भेदभावाची निषेध व टिका केली. ते सर्वांसाठी समान वर्तन, व्यक्तिगत स्वतंत्र्य आणि सम्मान मिळावा या विचारांचे होते. जात, धर्म, संप्रदाय व लिंगाच्या आधारावर कोणताही भेदभाव होवू नये. अशाप्रकारे डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्यायाचे समर्थक होते. एक समताधिष्ठित समाजाची स्थापना करु इच्छितात. समाजात प्रत्येक व्यक्तीचे स्वातंत्र्य, अधिकार व सन्मानाची निश्चितता केली. ते मानव जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात प्रगती, शांतात व सुरक्षा असावी म्हणत. वितरणाच्या न्यायावर आधारित समाज हे त्यांचे ध्येय होते. सर्वांसाठी मानवी हक्क असावेत. सर्वांना संधीची समानता यातच खज्या अर्थाने सामाजिक न्याय सामावला आहे.

## संदर्भ सूची

१) डॉ.आंबेडकर और सामाजिक न्याय - राजेश गुप्ता-मानक पब्लिकेशन्स प्रा.लिमिटेड, दिल्ली-१९९४.

२) गांधी, आंबेडकर, दलित एवं सामाजिक न्याय-डॉ.बबीता वर्मा-आविष्कार पब्लिशर्स, डिस्ट्रीब्युटर्स, जयपूर-२०१२.

३) शुद्र पूर्वी कोण होते ? - डॉ.भिमराव रामजी आंबेडकर - क्षितिज पब्लिकेशन, नागपूर-२००८.

४) श्रम, ब्राह्मण संस्कृतीयोंका संघर्ष-भागीरथ-मूलनिवासी प्रकाशन उदयपूर-२००५.